## (परिशिष्ट - इ)
## सौर ऊर्जेपासून वीज निर्मिती प्रकल्पांसाठी कार्यपध्दती.)

नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत (अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत) यापासून वीज निर्मितीच्या पारेषण संलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण-२०१५ च्या अंतर्गत ७५०० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

१. सौर ऊर्जा प्रकल्पाची किमान क्षमता १ मे.वॅ. (सौर पार्क वगळता) इतकी असेल. अशा प्रकल्पांना पारेषण जोडणी मंजूर करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१.१ प्रकल्प विकासकाने पारेषण जोडणीच्या शिफारशीसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाऊर्जाकडे सादर करणे आवश्यक राहील.

त्यामध्ये अन्य बाबींसह प्रकल्पाची क्षमता, प्रकल्पाच्या जागेचा तपशील, महापारेषण / महावितरण कंपनीच्या जवळच्या उपकेंद्राचे नाव इ. बाबींचा समावेश असेल.

१.२ सदर अर्जाची प्राथमिक छाननी करून महाऊर्जाकडून तांत्रिक योग्यता अहवालासाठी महापारेषण / महावितरण कंपनीस व अर्जदारास कळविण्यात येईल. महापारेषण / महावितरण कंपनीने त्याआधारे तांत्रिक योग्यता अहवाल तयार करून महाऊर्जाकडे त्याची प्रत पाठवावी.

१.३ महाऊर्जाकडे तांत्रिक योग्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतर सौरऊर्जा निर्मितीक्षम क्षेत्रात प्रकल्प येत असल्याची खातरजमा करून महापारेषण / महावितरण कंपनीकडे प्रकल्पाच्या पारेषण जोडणीसाठी महाऊर्जाकडून शिफारस करण्यात येईल.

१.४ प्रकल्प विकासकाच्या पारेषण जोडणी संमतीच्या अर्जाबाबत महापारेषण कंपनीने गठित केलेल्या पारेषण जोड समितीच्या स्तरावर छाननी व विचार विनिमय करण्यात येईल.

सदर समितीची रचना व कार्यकक्षेनुसार समितीकडून प्रकल्पास पारेषण जोड संमती देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तदपूर्वी समितीकडून प्रकल्पांतर्गत पूर्वी दिलेल्या पारेषण

जोड संमतीचा आढावा घेण्यात येईल. या मध्ये ज्या प्रकल्पांची प्रगती समाधानकारक नाही, अशा प्रकल्पांना दिलेली पारेषण जोड संमती प्रथम रद्द करण्यात येईल. नवीन पारेषण जोडणीबाबत घेतलेल्या निर्णयानुसार महापारेषण / महावितरण कंपनीकडून विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार पारेषण जोडणीसाठी संमती देण्यात येईल.

हमी शुल्क ( पारेषण जोड महापारेषण/ महावितरण ) :-

१.५ प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज महापारेषण / महावितरण कंपनीच्या वीज उपकेंद्रास मुदतीत वहन करुन देण्यासाठी प्रकल्प विकासकास इतर शुल्का व्यतिरिक्त हमी शुल्क( परतावा स्वरुपात) म्हणून रुपये १ लाख प्रति मे.वॅ. या प्रमाणे होणा-या रकमेचा धनाकर्ष महापारेषण / महावितरण कंपनीकडे सादर करावा लागेल. सदर धनाकर्ष महापारेषणसाठी “महापारेषण” या नावे आणि महावितरणसाठी “महावितरण” या नावे मुंबई येथे देय असावा.

१.६ सौर ऊर्जा प्रकल्पांना पारेषण जोड संमती दिल्यानंतर प्रकल्प विकासक/ प्रकल्प धारक यांचेकडून प्रकल्पांच्या निष्कासन व्यवस्थेची उभारणी महापारेषण / महावितरण यांनी दिलेल्या मुदतीत करणे आवश्यक आहे.

सदर निष्कासन व्यवस्थेची उभारणी महापारेषण/ महावितरण कंपनी यांच्या तांत्रिक परिमाणानुसार, त्यांच्या मान्यतेने व देखरेखीखाली करावी. यासाठी महापारेषण/ महावितरण कंपनीकडून पर्यवेक्षण शुल्क आकारले जाणार नाही.

जे प्रकल्प विकासक महापारेषण / महावितरण यांनी दिलेल्या मुदतीत निष्कासन व्यवस्था कार्यान्वित करतील त्यांचे हमी शुल्क महापारेषण / महावितरण कंपनी कडून बिनव्याजी स्वरूपात प्रकल्प विकासकांना परत करण्यात येईल.

१.७ प्रकल्पाच्या निष्कासन व्यवस्थेची उभारणी महापारेषण / महावितरण यांच्या विहित कार्यपध्दतीनुसार मुदतीत पूर्ण झाली नाही किंवा त्यासंदर्भात काहीही प्रगती दिसून

आली नाही तर संबंधित प्रकल्पाची पारेषण जोड संमती रद्द करण्यात येईल व प्रकल्पांतर्गत दिलेले हमी शुल्क महापारेषण / महावितरण यांच्याकडून जप्त करण्यात येईल.

१.८ पारेषण जोडणीसाठी आवश्यक असणारी निष्कासन व्यवस्था विहित मुदतीत पूर्ण झाली नसल्यास किंवा निष्कासन व्यवस्थेच्या उभारणीची काही प्रमाणात प्रगती झाली असल्यास व विकासकाने त्याच्या पूर्ततेसाठी मुदतवाढ घेण्याकरीता विनंती केल्यास, निष्कासन व्यवस्थेच्या प्रगतीचा आढावा घेऊन मुदतवाढीसाठी विचार करण्यात येईल.

निष्कासन व्यवस्थेच्या उभारणीच्या प्रगतीचा आढावा समितीकडून घेण्यात येईल व त्यानुसार पारेषण जोड मुदतवाढीचा निर्णय समितीकडून घेण्यात येईल. निष्कासन व्यवस्थेस मुदतवाढ देण्यासाठी महापारेषण / महावितरण कंपनीकडून निश्चित केलेल्या मुदतवाढ शुल्का प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. याबाबतची माहिती संबंधित कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

१.९ प्रकल्प विकासकाने सौरऊर्जा प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या संकोषण केंद्रामध्ये (Pooling Station) उपलब्धतता आधारित दर प्रणाली साठी लागणारे मीटर (ABT Meter with Tele communication facility) बसविणे आवश्यक आहे. तसेच वीज निर्मितीची माहिती रिअल टाइम व्हिजिबिलिटी RTU-DC,V-SAT मार्फत राज्य भार प्रेषण केंद्राला (SLDC) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

१.१० प्रकल्पांची पारेषण जोडणी व निष्कासन व्यवस्था उभारणी यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने जाहीर केलेले संबंधित आदेश / नियमावली यथायोग्य लागू राहतील. त्या अनुषंगाने कार्यवाही होत असल्याचे महापारेषण/ महावितरण कंपनीकडून खात्री करण्यात येईल.

सौर पार्क:--

१. सौर पार्कमध्ये एकापेक्षा अधिक सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश असावा, त्यातील प्रकल्पांची किमान क्षमता २५० कि.वॅ. असावी; असे १ मे.वॅ. पेक्षा कमी क्षमतेच्या प्रकल्पांची

एकत्रित क्षमता किमान १ मे.वॅ. असावी; तसेच प्रकल्पासाठी सामायिक निष्कासन व्यवस्था असावी. उदा. एका ठिकाणी किमान २५० कि.वॅ. क्षमतेचे चार प्रकल्प मिळून १ मे.वॅ. क्षमता धारण केल्यास आणि सामायिक निष्कासन व्यवस्था ठेवल्यास त्या ठिकाणास सौर पार्क असे संबोधण्यात येईल.

२. सौर पार्क अंतर्गत विकसित होणा-या प्रत्येक सौर ऊर्जा प्रकल्पाची स्वतंत्र नोंदणी महाऊर्जाकडे करणे बंधनकारक राहील. सदर नोंदणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व शुल्क प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकास महाऊर्जाकडे सादर करावी लागतील .

२.१ सौर पार्क करिता पारेषण जोडणी शिफारशीसाठी वरील मुद्दा क्र. १ येथे नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प विकासकाने कार्यवाही करावी. सौर पार्कच्या एकूण क्षमतेसाठी पारेषण जोड शिफारस महाऊर्जा कार्यालयाकडून देण्यात येईल.

३. सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी - सदर धोरणांतर्गत सौर ऊर्जेपासून वीज निर्मिती करणा-या प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे करणे बंधनकारक राहील. सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेची विक्री ज्या मार्गाने करण्यात येणार आहे त्याची माहिती नोंदणी अर्जात नमूद करणे आवश्यक राहील. त्यानुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी करण्यात येईल. सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पास महावितरण/महापारेषण कंपनीकडून पारेषण जोड संमती (Grid Connectivity) प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पधारकाने प्रकल्प नोंदणीसाठी खालील नमूद साक्षांकित (attested) कागदपत्रे महाऊर्जाकडे सादर करावीत.

(अ) प्रकल्पास महावितरण / महापारेषण यांचेकडून मिळालेली पारेषण जोड संमती

(ब) प्रकल्पाच्या जागा मालकी संबंधीची कागदपत्रे उदा. नोंदणीकृत खरेदीखत व ७/१२ उतारा / जिल्हाधिका-यांकडील पत्र

(क) सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report)

(ड) प्रकल्प किंमतीच्या किमान ३०% रकमेचे राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेचे सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट

(इ) महाऊर्जा कार्यालयाने विहित केलेले नोटराईज्ड हमीपत्र

(फ) सौर पार्क मध्ये प्रकल्प विकसित करणाऱ्या प्रकल्प धारकास ज्या सौर पार्क प्रकल्प विकासकाच्या पारेषण जोड संमतीवर प्रकल्प जोडावयाचा आहे त्या सौर पार्क विकासकासोबत सर्व तपशीलासह पारेषण जोड संमती घेतल्याबद्दल संयुक्तरित्या केलेले हमीपत्र सादर करावे लागले.

३.१ प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांना शासकीय पडीक जमिनीवर प्रकल्प विकसित करावयाचा असल्यास त्यांना संबंधित जिल्हाधिका-याकडून त्यांच्या प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे केल्यानंतर जमीन उपलब्ध करून देण्यात येईल याबाबतचे जिल्हाधिका-यांकडील पत्र महाऊर्जाकडे सादर करावे लागेल.

प्रकल्प नोंदणी शुल्क :-

३.२ महाऊर्जाकडे प्रकल्प नोंदणीसाठी प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकास नोंदणी शुल्क रू. ५० हजार प्रति मे.वॅ. याप्रमाणे धनाकर्षाद्वारे जमा करावे. सदर धनाकर्ष “महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण” पुणे यांच्या नावे देय असावा.

हमी शुल्क :-

३.३ प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी सौर ऊर्जा प्रकल्प नोंदणी पत्राच्या विहित मुदतीत म्हणजे अठरा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित करणे बंधनकारक राहील. त्याबाबत हमी शुल्क म्हणून रु. ३ लाख प्रति मे.वॅ. या रकमेची बँक गॅरंटी (राष्ट्रीयकृत बँकेची) प्रकल्प नोंदणीसाठी महाऊर्जाकडे सादर करावी.

३.४ सौर ऊर्जेपासून वीज निर्मिती प्रकल्पासाठी प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांच्याकडून प्रकल्प नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व शुल्क यासह प्रस्ताव प्राप्त झाल्यावर प्रस्तावाची छाननी महाऊर्जा कार्यालयाकडून करण्यात येईल. सर्व आवश्यक

कागदपत्रे व शुल्कासह प्रस्ताव परिपूर्ण असल्यास मा. अध्यक्ष, महाऊर्जा यांच्या मान्यतेने महाऊर्जा कार्यालयाकडून प्रकल्पाची नोंदणी करण्यात येईल. सदर नोंदणीपत्राची मुदत १८ महिन्यांची राहील.

४. प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांचेकडून सदर प्रकल्प अठरा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित झाल्यानंतर व कार्यान्वित झाल्याबाबतचा महावितरणचा अहवाल महाऊर्जा कार्यालयास सादर केल्यानंतरच महाऊर्जाकडून प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकास हमीशुल्कांतर्गत घेतलेली बँक गॅरंटी परत केली जाईल.

४.१ प्रकल्प विकासक / प्रकल्प धारक यांचेकडून सदर कालावधीत प्रकल्प कार्यान्वित झाला नाही आणि विकासकाने मुदतवाढ घेतली नाही तर हमी शुल्का अंतर्गत जमा केलेल्या बँक गॅरंटीचे महाऊर्जाकडून रोखीकरण करण्यात येईल.

५. सौरऊर्जा प्रकल्पांना दिलेल्या प्रकल्प नोंदणी पत्राच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या कालावधीत प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकाकडून प्रकल्प कार्यान्वित होऊ शकला नाहीतर प्रकल्प विकासक /प्रकल्प धारक यांचेकडील अर्ज व मुदतवाढ व शुल्क याच्या अनुषंगाने मुदतवाढ देण्यात येईल.

**६ मुदतवाढ शुल्क :-**

६.१ महाऊर्जा कार्यालयाकडून दिलेल्या प्रकल्प नोंदणी पत्रातील मुदतीमध्ये जास्तीत जास्त १२ महिन्याची मुदतवाढ दोन टप्प्यात देण्यात येईल.

पहिल्या टप्प्यात रू. १ लाख प्रति मे.वॅ. एवढे मुदतवाढीसाठी शुल्क आकारून ६ महिन्यांची मुदतवाढ प्रगतीचा आढावा घेऊन महाऊर्जा कार्यालयाकडून देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यातील ६ महिन्यांची मुदतवाढ हवी असल्यास प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेऊन व २ लाख रूपये प्रति मे.वॅ. मुदतवाढीचे एवढे शुल्क आकारून महाऊर्जा कार्यालयाकडून मुदतवाढ देण्यात येईल.

मुदतवाढ शुल्काची रक्कम संबंधितांना आगाऊ स्वरूपात महाऊर्जाकडे जमा करावी लागेल. मुदतवाढ दिलेल्या १२ महिन्याच्या कालावधीत प्रकल्प कार्यान्वित झाला नाही तर हमी शुल्का अंतर्गत जमा केलेल्या बँक गॅरंटीचे रोखी करण करण्यात येईल.

६.२ महाऊर्जाकडे नोंदणी करण्यात येणा-या सौर ऊर्जा प्रकल्पांना नवीन व नवीकरणीय ऊर्जेपासून वीज निर्मिती प्रकल्पांसाठीचे - २०१५ च्या धोरणांतर्गत देय असणा-या सोयी सवलती व सूट लागू राहतील. संबंधित प्रकल्पाच्या नोंदणीपत्रात याबाबत उल्लेख करण्यात येईल.

७. सार्वजनिक - खाजगी भागीदारी (PPP) - या पद्धतीने विकसित होणा-या सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे करणे आवश्यक राहील. सदर नोंदणी महानिर्मिती आणि प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांच्यामध्ये प्रकल्प विकसन करार झाल्यानंतर करण्यात येईल.

८. स्पर्धात्मक निविदा पध्दत (competitive bidding) : या पद्धतीने विकसित होणा-या सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे करणे आवश्यक राहील. सदर नोंदणी परवानाधारक वीज वितरण कंपनीकडून प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांची निवड झाल्यानंतर करण्यात येईल. स्पर्धात्मक निविदा पध्दत ही नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार आणि राज्य विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेने करण्यात येईल.

९. सार्वजनिक-खाजगी पध्दतीने आणि कालव्यावरील सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करण्यासाठी महानिर्मिती आणि जल संपदा विभागाकडून स्वतंत्ररित्या कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.

१०. सदर धोरणाच्या तारखेपर्यंत ज्या प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झालेले नाहीत त्या प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकांना त्यांचे प्रकल्प महाऊर्जाकडे नोंदणी करणे आवश्यक राहील.

११. सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीपूर्वी व उभारणीनंतरच्या आवश्यक त्या सर्व कायदेशीर व वैधानिक बाबींची पूर्तता प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या सर्व परवानग्या, संमतीपत्रे व ना-हरकत प्रमाणपत्रे संबंधित विभागाकडून परस्पर प्राप्त करून घेणे तसेच संबंधित विभागांच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्रकल्प विकासक व प्रकल्पधारक यांची राहील. त्याबाबतचे व अन्य बाबींचा समावेश असलेले महाऊर्जाने विहित केलेले हमीपत्र / हमीपत्रे प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी सादर करावीत. यासाठी प्रकल्प विकासक/ प्रकल्पधारक यांस आवश्यकतेनुसार महाऊर्जाकडून सहकार्य करण्यात येईल.

१२. सौर ऊर्जा प्रकल्पांचा वीज खरेदी करार करण्यासाठी किंवा खुला प्रवेश मंजूर करण्यासाठी किंवा नित्यनूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राद्वारे वीज विक्री मंजूर करण्यासाठी महाऊर्जाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील. सदर धोरणांतर्गत निश्चित केलेल्या ७५०० मे.वॅ. क्षमतेच्या उद्दीष्टांपर्यंत प्रकल्प नोंदणी मर्यादित ठेवण्यात येईल.

१३. वीज खरेदी करार / खुला प्रवेश, महावितरण / महापारेषण कंपनीबरोबर झाल्यानंतर प्रकल्पधारकास त्याची प्रत महाऊर्जा कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

१४. प्रकल्प नोंदणी झाल्यानंतर प्रकल्प धारकास नोंदणीपत्रात काही बदल उदा. प्रकल्पाच्या नावात बदल, प्रकल्पाच्या क्षमतेत बदल इ. करावयाचे झाल्यास त्यासाठी स्वतंत्र अर्ज महाऊर्जाकडे करावा लागेल. याकरिता प्रकल्प धारकाने रु. २५,०००/- प्रति प्रकल्प प्रमाणे प्रक्रिया शुल्क महाऊर्जाकडे धनाकर्षाद्वारे जमा करावे.

१५. प्रकल्प कार्यान्वित झाल्याची नोंद - प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर वीज वितरण कंपनीचे प्रकल्प कार्यान्वित झाल्याबाबतचे प्रमाणपत्र प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी महाऊर्जा कार्यालयास सादर करावे. यानंतर प्रकल्प कार्यान्वित झाल्याची नोंद महाऊर्जाकडे करण्यात येईल.

१६ प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेची परवानाधारक कंपनी / एसएलडीसी (SLDC) यांच्याकडून प्रमाणित केलेली वार्षिक (आर्थिक वर्षनिहाय) माहिती महाऊर्जाकडे सादर करणे आवश्यक आहे.

*********